शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

वर्ष ९ वे | ६ ऑक्टोबर १९९२ | अंक १३ वा

# शेतकरी आंदोलन कुंठित व्हायचे नसेल तर –

**– शरद जोशी**

शेतकरी संघटनेच्या दोन गुणांबद्दल प्रत्येक पाईकास विलक्षण अभिमान वाटतो. संघटनेचा विचार आणि संघटनेचे आंदोलनाचे तंत्र.

संघटनेचा विचार हा काही शेतीवर जगणाऱ्या समाजाच्या तात्कालिक स्वार्थाचा विचार नाही. उत्क्रांतीपासूनच्या मनुष्यजातीच्या इतिहासाच्या प्रवाहात पडलेले अडसर दूर करून, माणसाला माणूस म्हणून जगण्याचा मार्ग सुकर करणे, एवढा या विचाराचा आवाका आहे. हे मुख्य सूत्र डोळ्यासमोर अचल ठेवून समकालीन परिस्थितीचा वास्तविक अर्थ लावणे ही संघटनेची महत्त्वाची कामगिरी.

विचारातली तर्कशुद्धता आणि सुसूत्रता ह्याखेरीज आपल्या उद्दिष्टांकडे वाटचाल करतांना नवोन्मेषशालिनी प्रतिभेचा संघटनेने क्षणोक्षणी प्रत्यय दिला. आंदोलनांचे वेगळेवेगळे मार्ग, पद्धती, रणनीती यांच्या उपयोगाने दहा वर्षांत संघटनेने चमत्कार घडवून दाखवला.

आंदोलनाच्या चढत्या काळांत डाव्या चळवळीची विचारांची ठराविक चाकोरी आणि आंदोलन पद्धतीतील तोचतोचपणा या बद्दल आम्ही डाव्यांची चेष्टा करायचो.

*'डाव्या कार्यकर्त्यांची परिस्थितीही मोठी विचित्र झाली आहे. शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे नाव घ्यावे पण काम करावे कामगारांचे, पांढरपेशांचे. त्यांची मजुरी वाढवून द्यावी, बोनस मागावे, इतर अटी सुधारून घ्याव्यात, महागाईला विरोध करावा हे कार्यक्रम त्यांनी वर्षानुवर्षे राबविले.'*

(प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश-२, पृ. २८)

*'गेल्या १० वर्षांत पुष्कळशी*

---

देशाच्या आर्थिक क्षेत्रात परिवर्तन अपरिहार्य झाले आहे. कितीही नाही म्हटले तरी जगाच्या बरोबर राहायचे तर आज ना उद्या मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारणे भाग आहे. देशात या परिवर्तनाची आज चाहूल लागली असली तर शेतकरी संघटनेने अगदी सुरुवातीपासून मुक्त अर्थव्यवस्थेची मागणी केली आहे. गेली बारा वर्षे 'सूट सबसिडीचे नाही काम; भीक नको, घेऊ घामाचे दाम' अशी घोषणा करीत काम करणारे शेतकरी संघटनेचे बरेच कार्यकर्ते नव्या अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीच्या चुटपुटत्या सुरुवातीचा परिणाम म्हणून झालेल्या खतांच्या भाववाढीने, विजेच्या संभाव्य दरवाढीने भांबावून गेले आहेत. त्यामुळे 'सूटसबसिडी'च्या हत्याराने शेतकऱ्यांचे गळे कापणाऱ्या नेहरूनीतीचा एकीकडे धिक्कार करीत असतांना सूटसबसिडविरहित मुक्त अर्थव्यवस्थेतील दरवाढीलाही विरोध करीत आहेत.

शेतकरी संघटनेने गेली बारा वर्षे शेतकऱ्यांच्या हिताची जी व्यवस्था यावी यासाठी लढाई दिली ती व्यवस्था खरोखरी येत आहे. हा शेतकरी संघटनेचा, म्हणून ती ज्याचे प्रतिनिधित्व करते त्या 'भारता'चा विजय आहे. हा विजय हातचा घालवायचा नसेल तर 'भारता'च्या प्रतिनिधी कार्यकर्त्यांनी आता छलांग मारण्याची आवश्यकता आहे हे सांगण्यासाठी श्री. शरद जोशी या लेखातून त्यांना भूतकाळात फिरवून आणीत आहेत.

या लेखातील उद्धरणे "शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती" व "प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश भाग-२" या पुस्तकांतील आहेत. यांतील पहिले पुस्तक सन १९८१ मध्ये झालेल्या प्रशिक्षण शिबिरावर आधारलेले आहे, तर दुसरे १९८३ ते १९८५ या काळातील लेखांचा संग्रह आहे.

*युवाशक्ती अनेक चळवळीत तिला निश्चित धोरण न मिळाल्याने फुकट गेली आहे. वैफल्यग्रस्त झाली आहे. यात विद्यार्थी मंडळीचा भरणा जास्त आहे. कुठं बिहारमध्ये एका पोलिस चौकीत एका महिलेवर बलात्कार झाला, लगेच इथं बीडला तलाठी किंवा तहसिलदार किंवा जिल्हाधिकाऱ्यांसमोर मोर्चा गेला आणि काढलं निवेदन. आणखी कुठे काही घडलं की पुन्हा मोर्चा, निदेवन. सहा महिने हा उत्साह टिकतो पोरांच्यात, मग पोरांना वाटतं हे काही खरं नाही. त्यातनं काही मिळत नाही आणि तो अन्याय दूर होत नाही.*

(शेतकरी संधटना : विचार आणि कार्यपद्धती, पृ. ३५)

डाव्या आणि इतर चळवळींना आपण हिणवले आणि आज प्रत्यक्ष शेतकरी आंदोलनातही विचारांची चाकोरी आणि आंदोलनाचा तोचतोचपणा हे आजार घुसू पाहात आहेत. याची काही लक्षणे आधीही दिसत होती. नवीन आर्थिक धोरणामुळे परिस्थिती बदलली आहे आणि संघटनेची सर्वच रणनीती जोखून पाहण्याची आवश्यकता आहे यावर संघटनेच्या मान्यवर नेत्यांचाही विश्वास बसत नव्हता. चतुरंग शेती हा विषय संघटनेचा नाही, संघटनेचे काम फक्त आंदोलनच आहे असे अनेक नेते अजूनही बोलतात. पण हे समजण्यासारखे आहे. नवीन आर्थिक धोरण म्हणजे काय, खरेच कांही बदल होतो आहे की उगाचच दिखाऊ थातूरमातूर घोषणा होत आहेत याबद्दल कोणाचाही गोंधळ होणे साहजिक आहे, समजण्यासारखे आहे.

पण अगदी अलिकडे पालाश, स्फुरद खतांच्या किंमतीवरील नियंत्रणे काढून घेण्यात आली भाव भडकले आणि शेतकरी कार्यकर्त्यांत एक विचारांचा सनातनीपणा आचारातील रूढीप्रियता झपाट्याने पसरते आहे अशी साधार भीती वाटते.

काही तालुका पातळीच्या कार्यकर्त्यांनी वरखतांच्या भाववाढ-विरोधी कार्यक्रम घेतले, मोर्चे काढले किंवा दुसऱ्या पक्षांनी, संघटनांनी या हेतूने कार्यक्रम राबवले त्यांत भाग घेतला हे समजण्यासारखे आहे. विचारांची परिपक्वता तालुकापातळीवरील कार्यकर्त्यांत अपेक्षणे सदासर्वकाळ योग्य असतेच असे नाही. शिवाय, जागोजाग स्थानिक दबावाकडे दुर्लक्ष करून संघटनेच्या तत्त्वाला पक्के चिकटून राहणे मोठे कष्टाचे काम होते.

पण, काही जिल्ह्यांत नेहरूनीतीविरोधी प्रचारयात्रेत कार्यकर्त्यांनी भाषणे केली ती खताचे भाव आणि विजेचे दर यांच्या वाढीच्या विरोधी. प्रचारयात्रांकरिता काढलेल्या छापील पत्रकांत प्रामुख्याने या महागाईच्या निषेधाचाच सूर होता.

कडेलोट म्हणजे चंडीगडला पंजाब आणि हरयानातील भारतीय किसान यूनयिनतर्फे 'नेहरूनीती' पुतळा दहनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाच्या प्रसिद्धिपत्रकातही प्रामुख्याने विरोध केला होता तो वरखातांच्या अणि इतर दरांच्या महागाई बद्दल.

यात एक अजाणतेपणे, मोठा विनोद घडला. वरखतांवर नियंत्रण ठेवणे, सबसिडी देऊन त्यांचे भाव कमी ठेवणे, हा नेहरू नीतीचा एक महत्त्वाचा भाग. तो भाग टाकून देऊन नवीन सरकारने नियंत्रण काढून टाकण्याचे धोरण आखले. ज्यांना महागाईचा निषेध करावयाचा आहे, त्यांनी नेहरूनीतीचा जयजयकार केला पाहिजे आणि खुल्या बाजापेठेचा निषेध केला पाहिजे. शेतकरी कार्यकर्ते एकाच वेळी भाव वाढले म्हणून ओरड करत होते आणि भाव कमी ठेवणाऱ्या नेहरूनीतीचा पुतळा जाळत होते.

हे असे का घडावे? वरखतांच्या भावांसंबंधी संघटनेचे धोरण स्पष्ट आहे. 'सूट सबसिडीचे नाही काम, आम्ही घेऊ घामाचे दाम' ही संघटनेची सर्वांत लोकमान्य व लोकप्रिय घोषणा आहे. खतांवरील सबसिडी रद्द करावी ही संघटनेची महत्त्वाची मागणी आहे. १९९० साली वरखतांचे भाव ३० टक्के वाढवल्यावर चालू वर्षी ते पुन्हा ३० टक्क्यांनी वाढवावे अशी संघटनेची मागणी होती. हा विषय शेतकरी संघटकच्या २१ ऑगस्ट १९९१ च्या अंकात तपशीलवार मांडला गेला होता.

खरी गोष्ट अशी आहे की या विषयावर काही गोंधळ असण्याचे कारण नव्हते. अगदी १९८० सालापासून या विषयावर संघटनेची भूमिका स्पष्ट आहे.

*"शेतीमालाला उत्पादनखर्चा-प्रमाणे भाव मिळाला पाहिजे ही आपली मागणी. मग तुम्ही पेंड २.४० रु. दरानं विका किंवा खत रु. १००० ऐवजी रु. १०,००० टनानं विका. आपण उत्पादनखर्च काढताना शेतीसाठी लागणाऱ्या वस्तूंचे वर्षातले सरासरी भाव लक्षात घेतो. मागणी करताना उत्पादनखर्चाप्रमाणे भाव न मागता अमक्या वस्तूंच्या भावांवर नियंत्रण आणा, तमक्या गोष्टीसाठी अनुदान द्या, अशा मागण्या करून चालणार नाही. या मागण्या फार भानगडीच्या होतात. आपण कशा कशावर लक्ष ठेवणार? पेंडीचा भाव वाढला, करा आंदोलन. यूरियाचा भाव*

*वाढला करा आंदोलन. अशा पन्नास भानगडी निघतील. असं करण्यापेक्षा 'तुम्ही आम्हाला यूरिया १०००० रु. टनानं का द्या ना, तो खर्च लक्षात घ्या आणि आमच्या मालाला किंमत द्या' अशीच मागणी केली पाहिजे. यूरिया ज्या पदार्थापासून बनतो ते पेट्रोलियम जगातलं संपत चाललं आहे. (वरखतं मिळेनाशी झाली तर आपण कोणत्या प्रकारची शेती करणार आहोत? हा मोठा चर्चेचा विषय आहे.) कोणतंही सरकार आलं तरी पेट्रोलियमचे सर्व पदार्थ महागच करावे लागणार. किती वेळा अनुदानं मागत बसणार? प्रत्येक वर्षी पेट्रोलियम उत्पादनांचे भाव वाढले की काय आंदोलने करीत बसणार? त्यापेक्षा 'तुम्ही काहीही वाढवा. आम्ही जे काही खर्च करू ते लक्षात घेऊन आम्ही जो काय भाव काढू तो आम्हाला द्या. त्याच्या कुठं कमी घेणार नाही.' इतकीच मागणी केली."*

(शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती, पृ. ३४, ३५)

*"शेतकऱ्याने हक्काचे तेवढे मागावे. कोणत्याही मागणीला भीकेचे किंवा धर्मादायाचे स्वरूप असू नये. आम्हाला काहीतरी स्वस्तात द्या, काही तरी नादारीत द्या अशा तऱ्हेची मागणी पुढे मांडू नये हा संघटनेच्या विचारांचा पाया आहे.*

*आणि ठरविले तर किती गोष्टींबद्दल आपण अशी मागणी करणार? डिझेलचा भाव कमी करून पाहिजे. एंजिनचा भाव कमी करून पाहिजे, युरियाचा भाव कमी करून पाहिजे आणि वेगवेगळी तणनाशके, औषधे या प्रत्येकाचा भाव कमी करून पाहिजे. अशी मागणी करणे म्हणजे दुसऱ्याच्या घरात हात घालायला जाण्यासारखे आहे. खरे तर आमच्या शेतीमालाचा उत्पादनखर्च कळायला आम्हाला ३०-३५ वर्षे लागली, इतर वस्तूंच्या उत्पादनखर्चाची उठाठेव आपण कशाला करायची?*

*उदाहरणार्थ, एन्झिनचा भाव करून पाहिजे असे आपण समजू एन्झिन कशातून तयार होते, त्याचा उत्पादनखर्च काय, त्या कारखन्याचा प्रत्यक्ष खर्च किती आहे याचा सतत अभ्यास करत राहाण्याची आपली काही यंत्रणा तयार आहे का? नाही. मग कोणत्या आधारावर तुम्ही असे मांडणार आहात की एन्झिनचा भाव कमी करून मिळावा? आणि अशा किती मागण्या करायच्या? शेतीला शेकडो गोष्टी लागतात. या शेकडो गोष्टींच्या किमती कमी करून मागण्याऐवजी उत्पादनखर्चावर आधारित भावाची हक्काची एकच मागणी अधिक फायदेशीर आहे. कारण या वस्तूंच्या किंमती काही का असेनात त्यांचा खर्च शेतीमालाच्या रास्त भवातून भरून येईल.*

*शेतीमालाला रास्त भाव मिळत नसल्यामुळे खते, औषधे, डिझेल, एंजिन वगैरे आवश्यक गोष्टींच्या किमती परवडत नाहीत. त्यांच्यासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करावयाची झाली तरी मग शेकडो वस्तूंसाठी ते मागावे लागेल. अनुदान काय किंवा रास्त भावापर्यंतची दरवाढ काय, दोहोंचा ताण अखेरी अंदाजपत्रकावरच पडणार आहे. मग उत्पादनखर्चावर अधारित रास्त किंमतीचा हक्क सोडून शेतकऱ्यांनी अनुदानाची भीक का मागावी?*

*अनुदान द्यावयाचे ठरवले तरी शासन ते खते, औषधे, अवजारे अशा विशिष्ट कारणासाठी देते. शासनाने अशा तऱ्हेने अनुदान देण्यास शेतकरी संघटनेचा अजिबात विरोध नाही. आमचे म्हणणे इतकेच आहे की, अनुदान दिले किंवा शेतीला लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती खाली आणल्या तरीसुद्धा त्याप्रमाणे शेतीमालाचा उत्पादनखर्च काढून रास्त भाव द्या म्हणजे झाले."*

(शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती, पृ. १२२, १२३)

सबसिडीला विरोध हा शेतकरी संघटनेच्या तात्त्विक आणि भौतिक भूमिकेचा महत्त्वाचा भाग आहे. ही भूमिकाही नवी नाही.

*"यामधे पुन्हा कुठंतरी एक समाजवादी किंवा भांडवलवादी तत्त्वज्ञान डोकावतं. पण आजपर्यंत, आम्ही समाजवादी आहोत म्हणून सगळ्याचं राष्ट्रीयकरण झालं पाहिजे किंवा आम्ही भांडवलवादी आहोत तेव्हा आम्हाला स्वतंत्र बाजारपेठ पाहिजे म्हणून सगळे व्यापारी मंडळींनीच केलं पाहिजे या दोनही पुस्तकी विचारांमुळे शेतकऱ्याला लुटलं गेलं आहे. आपल्याला अशी पद्धत शोधून काढली पाहिजे की जिच्या साहाय्याने आपण दोन्हीकडच्या चोरांपासून वाचू शकू. अशी यंत्रणा सुरुवातीला सरकारनं निर्माण करावी अशी आपली मागणी आहे. अर्थात् सरकारकडून अशा प्रकारची मदत शेतकऱ्यांनी कायमची, वर्षानुवर्षे घेत राहायचं असं आपलं म्हणणं नाही. आपल्या संघटनेच्या सर्व विचारसरणीचा उद्देशच मुळी असा आहे की याच्यापुढे शेतकऱ्याला लाचारपणे कुणाकडे भीक मागण्याची, कुणाकडून मदत घेण्याची गरज लागता कामा नये. आज ते त्याला मागून घ्यावं लागतं आहे, त्याला ताठ मानेनं अभिमानानं जगता येत नाही याचं कारण असं की त्याचं हक्काचं जे आहे ते लुबाडून नेतात आणि नंतर मग दयाबुद्धीचं ढोंग करून भीक घातल्यासारखी थोडी मदत करतात.*

*म्हणूनच शेतकऱ्याच्या माथी लाचारीचं जिणं लादलं आहे. आपला शेतीमाल सरकारनं विकत घ्यावा किंवा त्याला भाव बांधून द्यावा इतकीसुद्धा लाचारी आमच्यामध्ये नको आहे."*

(शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती, पृ. ११५)

ज्या काळात नेहरूअर्थकारणाचा उदोउदो होता तेव्हांपासून संघटनेने नेहरूनीतीविरोधी भूमिका मांडली आहे.

*"नेहरूंच्या काळापासून औद्योगिकरणाच्या नावाखाली जो डोलारा उभा करण्यात आला तो किती पोकळ होता हे आता उघडकीस येत आहे. भारी उद्योगधंद्यांची कार्यक्षमता इतकी प्रचंड की लोखंड, कोळसा, वीज जगातल्या इतर कोणत्याही देशातल्यापेक्षां येथे महाग. वापराच्या वस्तू महाग आणि भिकार गुणवत्तेच्या. तयार होणाऱ्या मालाला खप नाही, कारखानदारी बुडायला आली. शेतकऱ्यांच्या शोषणाच्या आधारावर कारखानदारी उभी करण्याच्या नेहरूयोजनेचा फुगा फुटायला आला आहे."*

(प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश-२, पृ. १०१)

त्याबरोबर एक पर्यायी विचार आणि कार्यक्रम पुढे ठेवला.

*"शेतकरी संघटनेने एक संपूर्ण नवा अर्थविचार मांडला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या वसाहतींच्या गरिबी हटवण्याच्या प्रयत्नात (जे अपयश आले) त्याचा सुसंगत खुलासा करणारा हा विचार आहे. हा खुलासा करणे प्रस्थापित भांडवलदारी अर्थशास्त्र्यांना जमलेले नाही, समाजवादी अर्थशास्त्र्यांना तर नाहीच नाही. भांडवलनिर्मितीचे साधन श्रमशक्तीच्या शोषणातून होणारे अतिरिक्त मूल्य हे सूत्र मार्क्सकालीन आर्थिक समस्येस पुरेसे होते. आजच्या समस्या सोडवण्यास ते फार तोकडे पडत आहे. औद्यागिक प्रगतीसाठी लागणारी भांडवलनिर्मिती प्रमुखतः शेतीत होणाऱ्या नैसर्गिक गुणाकारातून होते. साम्राज्यवादाचा प्रमुख हेतू वसाहतीतील कच्च्या मालाच्या शोषणातून भांडवलनिर्मिती करणे हा होता. त्या काळात वसाहती दरिद्री होत गेल्या याचे कारण साम्राज्यवादी शोषण हे होय. स्वातंत्र्यानंतर पूर्वीच्या सर्व वसाहतीत गरीबी वाढत राहिली याचे कारण नव्या राज्यकर्त्यांनी साम्राज्यवाद्यांचे शोषणाचे धोरण देशाच्या हद्दीच्या आत वापरणे सुरू ठेवले. औद्योगिक विकासासाठी शेतीत होणारी बचत वापरणे अपरिहार्य आहे. पण याचा अर्थ बचत शेतकऱ्याकडून काढून नेली पाहिजे असे नाही. शेतकऱ्याच्या हाती या बचतीचे भांडवलात रूपांतर अधिक सुयोग्य, सुसंगत आणि संतुलित रीतीने होऊ शकते. शेतकऱ्यांच्या शोषणाशिवायही औद्योगिक विकास होऊ शकतो. इतका साधा, सोपा, सरळ आणि स्पष्ट असा विचार आहे. तिसऱ्या जगातील राष्ट्रांना आर्थिक आघाडीवर आलेल्या अपयशाचा पर्यायी तर्कशुद्ध खुलासा दिल्याखेरीज हा विचार आता कोणालाही सहजासहजी दूर सारता येणार नाही.*

*शहरी संपन्नांकडून संपत्ती काढून घेऊन ग्रामीण गरिबांना ती वाटावी अशा धर्मादायाचे हे वांझोटे तत्त्वज्ञान नाही. अशा धर्मादायांच्या विचाराला रोजगार हमी योजनेसारखा कार्यक्रम पुरा वाटेल. मग त्यात कितीही लाचारी आणि भ्रष्टाचार असो. समाज कायमचा रोजगार हमी योजनेवर जगू शकत नाही. विकासाची तर गोष्टच दूर. अर्थ व्यवस्थेतील तुंबारे काढून अभिसरण पुन्हा एकदा सुरू करून द्यावे म्हणजे विकासाची निसर्गसिद्ध प्रक्रिया जिवंतपणे चालू होईल."*

(प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश-२, पृ. ३७)

मनुष्य जातीच्या इतिहासाला नवी दिशा देऊ पाहणारा हा विचार. तो प्रत्यक्ष धरतीवर आपणारा भगिरथ कोण? तर *'हा विचार प्रत्यक्षात उतरवण्याचे काम प्रत्यक्षात शेतकऱ्यांना करावे लागणार आहे.....'* कारण *'भारताचे इंडियाकडून होणारे शोषण ही आजची महत्त्वाची संघर्ष रेषा आहे.'*

(प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश-२, पृ. ३८)

हे असे का घडते आहे? आपले उद्दिष्ट सिद्ध झाल्यानंतर स्वतःचे विसर्जन करण्याची तयारी ज्या संघटनेने पहिल्यापासून ठेवली तिच्यावर अशी वेळ का आली?

१९८३ साली डाव्या चळवळीला उद्देशून एक सूचना संघटनेने केली होती.

*"परिवर्तनात गुणात्मक बदल घडवून आणायचा असेल तर क्रांतीच्या प्रक्रियेत योग्य वेळी दुसरी छलांग मारावी लागते. ती मारण्याची ताकद गांधीवाद्यात मुळातच नव्हती. म्हणूनच भारतीय स्वातंत्र्याची चळवळ फसली. शेतकऱ्यांच्या या आंदोलनातही योग्य वेळी दुसरी उडी मारण्याची तयारी भारताचे अंतर्गत शोषणही ज्यांना दूर करावयाचे आहे त्यांना ठेवावी लागेल."*

(प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश-२, पृ. ३८)

नेहरूव्यवस्था ढासळवली, जातीयवाद्यांच्या आव्हानाला जोहाराच्या तयारीने उत्तर दिले, आणि शेतकऱ्यांना

हजारो वर्षे प्रतिक्षा असलेले आर्थिक स्वातंत्र्याचे युग प्रत्यक्षात समोरे आले, या वेळी दुसरी छलांग मारण्यात संघटना कमी पडता कामा नये.

ही दुसरी छलांग म्हणजे कापसाच्या उसाच्या, ज्वारीच्या, भावांचे आणखी एक आंदोलन नव्हे. 'भारत' आणि 'इंडिया' ही आजही महत्त्वाची रंघर्ष-रेषा आहे, पण शोषित म्हणजे 'भारत' आणि शोषक म्हणजे 'इंडिया' ही विभागणी आता थोडी बदलली आहे. उत्पादक विरुद्ध बांडगुळे, स्वकष्टाने अभिमानाने माणूस म्हणून जगणारे एका बाजूला आणि सरकारी पैशावर व सहाकरी लुटीवर मजा मारणारे दुसऱ्या बाजूला असे या नव्या संघर्षाचे स्वरूप आहे.

मग, दुसऱ्या छलांगेचे स्वरूप काय असू शकेल? एक म्हणजे शेतीची डागडुजी किंवा चतुरंग शेतीचा कार्यक्रम.

पण या पलिकडे एक महत्त्वाचा बदल घडला आहे. 'इंडिया-भारत' या रेषेच्या एका बाजूस उभे राहून लढावयास तयार असणारे प्रामुख्याने शेतकरीच होते. 'बांडगुळ-उत्पादक' संघर्ष रेषेच्या शेतकऱ्यांच्या बाजूला आता इतर कष्टाळू, जिद्दी, खुल्या बाजारपेठेत स्पर्धा करण्यास तयार असलेले उद्योजक येऊ शकतात. दुसऱ्या बाजूला सगळी भाऊगर्दी पुढारी, सहकारपेंढारी, आणि लायसेंस परमीटवर गब्बर झालेल्या नेहरूउद्योजकांची आहे.

या नव्या संघर्ष-रेषेवरची लढाई लढवायला नव्याने मोर्चेबंदी आणि साधने यांचा विचार आणि जुळवाजुळव आवश्यक आहे, तर दुसरी छलांग शक्य होईल. अन्यथा, नेहरूवादाचा पाडाव होऊनही भारताचा विजय हातून निसटून जाईल.

## शेतकरी संघटक : आजीव वर्गणीदार

### १ ऑगस्ट ते १ ऑक्टोबर १९९२

| | | | |
|---|---|---|---|
| १९८) | श्री. महावीर वि. का. स. (विकास) सेवा सोसा. लि. रुई | रुई | (कोल्हापूर) |
| १९९) | श्री. विलासराव वि. कोरे | वारणानगर | (वर्धा) |
| २००) | कृषी उत्पन्न बाजार समिती | मूर्तिजापूर | (अकोला) |
| २०१) | श्री. दिनेश माणिकराव धांदे | पुलगाव | (वर्धा) |
| २०२) | नाचगाव वि. का. स. सोसा. | नाचगाव | (वर्धा) |
| २०३) | श्री. शांताराम भांडेकर | येलाकेळी | (वर्धा) |
| २०४) | श्री. नामदेवराव फटिंग | धानोरा | (यवतमाळ) |
| २०५) | श्री. विजय सारभुकन | छोटी उमरी | (आकोला) |
| २०६) | श्री. सुधीर पाटील | पाळोदी | (आकोला) |
| २०७) | श्री. भारत पेन्शनवार | श्रीरामपूर पुसद | (यवतमाळ) |
| २०८) | श्री. उत्तम कोंडजी कदम | (लिंबगाव) | (नांदेड) |
| २०९) | श्री. महावीर इनाम धामणी वि. का. स. सोसा. लि. | इनामधामणी | (सांगली) |
| २१०) | श्री. ॲड. महावीर भूपाल पाटील | मौजे डिग्रस | (सांगली) |
| २११) | श्री. चेअरमन, गणपती जिल्हा कृषी औद्यो. संघ | सांगली | (सांगली) |
| २१२) | कृषी उत्पन्न बाजार समिती | सांगली | (सांगली) |
| २१३) | चेअरमन बाजीराव नागरी सह. पतसंस्था | सांगली | (सांगली) |
| २१४) | श्री. साहेबराव धोंडू पवार | सौंदाणे (सडक) | (नाशिक) |
| २१५) | सौ. सरोज हेमंत माटे | भोसा | (वर्धा) |
| २१६) | श्री. मदन यादव | वायगाव बैलभारे | (वर्धा) |
| २१७) | श्री. जनार्दन वैरागडे | कोरा | (वर्धा) |
| २१८) | ॲड. मकरंद रोकडे | मसाळा | (वर्धा) |
| २१९) | श्री. राजेंद्र जावंधिया | वायफड | (वर्धा) |
| २२०) | ॲड. दिगंबर उत्तम शेवाळे | मालेगाव | (नाशिक) |
| २२१) | श्री. माधवराव सुकदेव देवरे | दाभाडी | (नाशिक) |
| २२२) | श्री. कमलकिशोर चांडक | वायगाव (निपाणी) | (वर्धा) |
| २२३) | श्री. बजरंग बांगर | पिंपळगाव (खडकी) | (पुणे) |
| २२४) | श्री. अनिल जयसिंगराव धनवट | श्रीगोंदा | (अहमदनगर) |
| २२५) | डॉ. हासनराव शंकरराव देशमुख | तराडखेड | (बुलढाणा) |
| २२६) | चेअरमन, वसंत सह. दूध उत्पा. व पुर. संस्था लि. | सांगलीवाडी | (सांगली) |
| २२७) | प्राचार्य, विवेकानंद कॉलेज | कोल्हापूर | (कोल्हापूर) |
| २२८) | आमदार दत्ता पाटील | अलिबाग | (रायगड) |

❋ ❋ ❋

## शेतकरी संघटना : कार्यकारिणी बैठक

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक दि. १० व ११ ऑक्टोबर १९९२ रोजी औरंगाबाद येथे होणार असून या बैठकीत शेतकरी संघटनेच्या पुढील कार्यक्रमाची आखणी व त्या कार्यक्रमास आवश्यक बांध णीचे स्वरूप यांवर विचार करण्यात येईल. ही बैठक फक्त कार्यकारिणीचे सदस्य, जिल्हा प्रमुख व विशेष निमंत्रितांसाठीच खुली राहील असे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. किशोर माथनकर कळवितात.

## स्त्रियांच्या बाबतीतील पक्षपात गरीबीचे कारण

स्त्रियांच्या बाबतीतील लिंगाधारित पक्षपात, प्रामुख्याने विकसनशील देशांमधील गरीबी आणि लोकसंख्यावाढीला कारणीभूत आहे.

जोडी जॅकोबसन या विदुषीने आंध्रप्रदेशातील काही खेड्यांच्या अभ्यासावर आधारलेल्या आपल्या 'वर्ल्डवॉच' या शोधनिबंधात हा निष्कर्ष काढला आहे.

स्त्रियांना आर्थिक आधारापासून वंचित केले जाते. यात कमी वेतन देण्यापासून ते विकास कार्यक्रमापासून दूर ठेवणे, जमिनीवरील मालकीत कायद्याची आडकाठी तसेच नियोजनपूर्वक हिंसाचार इथपर्यंत सर्व मार्ग हाताळले जातात.

या पक्षपातामुळे कोट्यवधी स्त्रिया कर्ज, शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्यसेवा, बाल-संगोपन आणि कायदेशीर प्रतिष्ठा यांपासून वंचित राहिल्यामुळे त्यांना आपली स्थिती उंचावण्याची संधीच मिळत नाही.

आंध्र प्रदेशातील सिकंदर नगर गावाच्या अभ्यासावरून श्रीमती जॅकोबसन म्हणतात,

* या गावातील स्त्रिया पहाटे चार वाजता उठतात दिवसभरात तीन पाळ्यांचे काम करतात.

* कुटुंबासाठी कुटुंबातील प्रत्येक स्त्री कुटुंबातील पुरुषापेक्षा दुप्पट तास काम करते.

* तरीही, त्या अधिक गरीब आहेत आणि कुटुंबाच्या गरजा भागवू शकत नाहीत.

* मुलांना जन्म देण्यानेच त्यांची आर्थिक असुरक्षितता कमी होऊ शकते त्यामुळे लोकसंख्यावाढ वेगाने होते.

* निरक्षर स्त्रियांचे प्रमाण वाढत आहे. त्यामानाने पुरुषांतील निरक्षरतेच्या वाढीचे प्रमाणे नगण्य आहे.

आपल्या निबंधात श्रीमती जॅकोबसन यांनी सुचविले आहे की जोपर्यंत स्त्रियांच्या हाती आर्थिक साधनांची मालकी जात नाही तो पर्यंत लोकसंख्या वाढीची गती मंदावणार नाही आणि गरीबीही कमी होणार नाही.

(इंडियन एक्स्प्रेस, १४/१/९२ वरून)

## विषारी अन्नाला मागणी नाही

आपल्या देशातील प्रत्येक माणूस रोजच्या जेवणातून वर्षाकाठी १५ ग्रॅम जालीम विष खातो. पिकांवर फवारल्या जाणाऱ्या रासायनिक औषधांतील काही अंश अन्नधान्ये, भाजीपाला वगैरेमध्ये शिल्लकच राहातो. शरीरात जाणाऱ्या या विषामुळे माणसाची रोगप्रतिकारक शक्ती कमी होत जाते. ही माहिती इंडो-बायोटेक कंपनीने केलेल्या तपासणीत उजेडात आली.

मुंबईतील 'गुड व्हॅल्यु मार्केटिंग लि.' या कंपनीने रासायनिक विषांशापासून मुक्त अशा प्रमुख अन्नपदार्थांची निर्मिती व व्यापार करण्याच्या दृष्टीने काही कंपन्यांना उत्तेजन दिले आहे.

त्यापैकी 'इंडो-बायोटेक' नावाची कंपनी विषांशमुक्त तांदुळ, डाळी, आटा (गव्हाचे पीठ), खाद्य तेले आणि गूळ यांचा व्यापार लवकरच सुरू करणार आहे.

या साठी लागणारा शेतीमाल ही कंपनी महाराष्ट्र, गुजरात या राज्यांतील व मध्यप्रदेशांतील काही भागातील नैसर्गिक शेतीचा अवलंब करणारे तसेच शेतात रासायनिक रोगनाशक औषधांचा वापर किंवा इतर पिकावर कोणतीही रासायनिक प्रक्रिया न करणाऱ्या शेतकऱ्यांकडून खरेदी करणार असून येत्या महिन्यात मुंबईत ५०० दुकानांची साखळी तयार करून त्यांमार्फत ग्राहकांना पुरविणार आहे. लवकरच ही दुकानांची संख्या १५०० पर्यंत जाईल.

गुड व्हॅल्यु मार्केटिंग कंपनी बिगर रासायनिक शेतीसाठी सेंद्रीय खते तसेच वनस्पतीजन्य औषधांच्या निर्मितीसाठीही काही कंपन्यांना प्रोत्साहन देत आहे.

या सर्व व्यवसायात विक्रीस आलेल्या मालाची कडक तपासणी करण्याची यंत्रणाही उभी करण्यात येत असून या तपासणीस उतरणाऱ्या मालाला प्रोत्साहनात्मक किंमती देण्याची कंपनीची योजना आहे.

मुक्त अर्थव्यवस्थेचे वारे सुरू झाल्यापासून शेतीमालाच्या व्यापारासंबंधी परिवर्तन होऊ लागले आहेत. या परिवर्तनात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला पाहिजे असे श्री शरद जोशींनी 'चतुरंग शेती' ची संकल्पना मांडतांना म्हटले आहे. त्यावेळी त्यांनी असेही म्हटले होते की, 'हा बदल होणार आहे. यात शेतकऱ्यांनी भाग घेतला नाही तरी इतर लोक हे काम करण्यास पुढे येणार आहेत.'

❖ ❖ ❖

## शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती (पहाणी)

१९८० व १९९२ या वर्षांतील शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीची तुलना करण्याच्या दृष्टीने कृषि योगक्षेम संशोधन न्यास आणि कृषि अर्थ प्रबोधिनी यांच्या तर्फे एक प्रश्नावली शेतकरी संघटकच्या ६ सप्टेंबर १९९२ च्या अंकात प्रकाशित करण्यात आली होती. ती भरून पाठविण्याची शेवटची तारीख २० सप्टेंबर देण्यात आली होती. त्या दिवशी रविवार असल्यामुळे २१ सप्टेंबरपर्यंत पोष्टात टाकल्या गेलेल्या प्रश्नावली पुढील कार्यवाहीसाठी एकत्रित केल्या आहेत. या कार्यालयाकडे एकूण ४७८ प्रश्नावली भरून आल्या आहेत. त्यांचे जिल्हावार आकडे पुढील प्रमाणे : नागपूर (७), चंद्रपूर (५), भंडारा (१), वर्धा (१), यवतमाळ (१२), जालना (३), नांदेड (१६), परभणी (६२), लातूर (६१), उस्मानाबाद (१), कोल्हापूर (४), सांगली (१), सातारा (१), सोलापूर (१), पुणे (२), अहमदनगर (२५), नाशिक (१०), धुळे (२३), जळगाव (११), रायगड (२) तसेच कर्नाटकातील बिदर व गुलबर्गा जिल्ह्यांतून प्रत्येकी १.

या प्रश्नावलींची छाननी सुरू असून त्यातील निष्कर्ष लवकरच प्रकाशित करण्यात येतील.

दरम्यान, ६ सप्टेंबरच्या अंकात जाहिर केल्याप्रमाणे शेतकरी संघटकचे अंक प्रश्नावली भरून पाठविणाऱ्या शेतकऱ्यांना पाठविण्याच्या दृष्टीने यादी करण्याचे काम चालू असून त्या सर्वांना २१ ऑक्टोबर १९९२ पासून अंक पाठविण्यात येतील.

**कृषि अर्थ प्रबोधिनी**

# शेतमजुरांची मजुरी वाढणार

केंद्रशासनाने शेतमजुराच्या किमान वेतनात वाढ करण्याचे ठरविले असून रोजच्या मजुरीचे प्रस्तावित दर पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| अकुशल | रू. २६ ते ३० |
| अर्धकुशल | रु. २९ ते ४१ |
| कुशल | रु. ३४ ते ४८ |
| विशेष कुशल | रु. ४१ ते ५८ |

या शिवाय, जो मजूर वर्षातील २४० किंवा अधिक दिवस कामावर असेल त्याला शासनाने ठरविलेल्या सालदारीच्या पाच टक्के रक्कम ज्यादा मजुरी द्यावी लागेल.

केंद्रशासनाच्या मजूरमंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या सूचनापत्रात ही माहिती दिली आहे.

या निर्णयामुळे ज्यांच्यावर/ज्यांच्या व्यवसायावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता आहे त्यांच्याकडून मजूरमंत्रालयाने दोन महिन्यांच्या आत सूचना मागविल्या असून त्या सूचनांवर विचार करून या बाबतीत अंतीम निर्णय घेण्यात येईल असेही या पत्रकात म्हटले आहे.

# शेतीच्या विजेची लवकरच दरवाढ

महाराष्ट्रात शेतीसाठी केल्या जाणाऱ्या वीजपुरवठ्याचे दर वाढविण्यात येणार असून येत्या महिन्याभरात त्या संबंधी निर्णय घेण्यात येईल असे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सोलापूर येथे २६ सप्टेंबर १९९२ रोजी एका बैठकीत सांगितले.

शेतीस होणाऱ्या वीजपुरवठ्याचा दर १६ पैसे युनिटवरून ५० पैसे युनिट करावा आणि प्रतिअश्वशक्ती पुरवठ्याच्या दर १५० रुपयांवरून ३०० रुपयांपर्यंत वाढवावा अशी सूचना केंद्रसरकारने केली आहे. तसा निर्णय राज्यसरकारने अद्याप घेतला नसला तरी तो लवकरच घ्यावा लागेल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, ''राज्य विद्युत मंडळास एक युनिट वीज तयार करण्यास एक ते सव्वा रुपया खर्च येतो. त्या विजेचा पुरवठा शेतकऱ्यांना १६ पैसे युनिटप्रमाणे केल्यामुळे राज्य सरकारला वीज मंडळास दरवर्षी ७०० ते ८०० कोटी रुपयांचे अनुदान द्यावे लागते. विजेचा उत्पादनखर्च आणि शेतीला होणाऱ्या वीजपुरवठ्यातून मिळणार उत्पन्न यांत मोठी तफावत आहे. त्यामुळे वीजपुरवठ्याचे दर वाढविण्याचा निर्णय कटू असला तरी त्याला पर्याय नाही.''

मुक्त अर्थव्यवस्थेत उत्पादन खर्च आणि उत्पन्न यांच्या मिळवणीला महत्त्व आहे. मुख्यमंत्र्यांनी विजेच्या बाबतीत जी मांडणी केली तीच मांडणी शेतीमालाच्या बाबतीत केली तर शेतकरी या वाढलेल्या वीजदराचे स्वागतच करतील. उलट, वाढलेले दर हे वीजमंडळाचा वास्तव उत्पादनखर्च भरून निघेल इतके चढे असावेत असा आग्रह धरील. ते शेतीमालाच्या भावातून भरून तर निघतीलच. पण त्याशिवाय, विजेची पूरेपूर किंमत देत असल्याने मंडळाकडून मिळणाऱ्या सेवेबद्दल तो ताठ मानेने विशेष काटेकोर राहू शकेल. आज सोळा पैशाची भिकेची वीज कधी आली, कधी गेली तरी तक्रार करता येत नाही, त्यातून सुटका होईल.

# सेवाग्राम येथे आश्रमपरिसरात नेहरूनीतीचे दहन

वर्धा जिल्यातील शेतकरी संघटनेच्या वतीने सेवाग्राम येथील आश्रमपरिसरात बापू कुटी शेजारी २ ऑक्टोबर १९९२ रोजी नेहरूनीतीच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. दुपारी एक वाजता उन्हाचा प्रचंड कहार असल्यामुळे या कार्यक्रमासाठी जमलेले सुमारे तीन हजार शेतकरी स्त्रीपुरुष आश्रमातच बसले होते. त्यांच्यासमोर अध्यक्ष श्री. किशोर माथनकर, आमदार सौ. सरोज काशीकर, आमदार डॉ. वसंतराव बोंडे, शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सुमनताई अग्रवाल, श्री. रवि काशीकर यांची नेहरूनीतीच्या विरोधात भाषणे झाली. नंतर नेहरू नीतीच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

**प्रेषक : श्री रवि काशीकर, वर्धा**

(इतर जिल्यातील बातम्या अजून (३ ऑक्टोबर सायंकाळ) पर्यंत न पोहोचल्याने पुढील अंकात देण्यात येतील. – संपादक)

## शेतकरी संघटक पाक्षिकाच्या मालकीसंबंधी

### फॉर्म नं. ४ रुल नं ८ अन्वये निवेदन *

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | अंगारमळा, मु. पो. आंबेठाण<br>ता. खेड, जि. पुणे. |
| २. | प्रकाशन काळ | : | पाक्षिक |
| ३. | संपादक, मुद्रक<br>प्रकाशक | : | नाव : सुरेशचंद्र पांडुरंग म्हात्रे<br>राष्ट्रीयत्व : भारतीय<br>पत्ता : अंगारमळा, मु. पो. आंबेठाण,<br>ता. खेड, जि. पुणे. |
| ४. | वृत्तपत्राची मालकी व भांडवलात<br>१% पेक्षा अधिक भागी<br>असणारांची नावे व पत्ते | : | श्री. मोहन बिहारीलाल परदेशी<br>मु. पो. चाकण<br>ता. खेड, जि. पुणे. |
| ५. | रजि. क्रमांक | : | RN 39926/83 |

मी जाहिर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे.

आंबेठाण,
६ ऑक्टोबर १९९२

**सुरेशचंद्र म्हात्रे**
प्रकाशक

* This fresh statement is made because revised declaration is made before the District Magistrate on the 28th September 1992 declaring some changes in the previous declaration.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th, October 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
October 6, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

# अकोल्यात नेहरूनीतीचे दहन

अकोला येथे गांधी जवाहर बागेसमोर सहा हजार शेतकरी पुरूष व पाचशे शेतकरी महिलांनी महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी, महात्माजींचा विकसाचा मंत्र पायदळी तुडवून शेतकऱ्याला दारिद्र्याच्या खाईत लोटणाऱ्या नेहरूनीतीच्या पुतळ्याचे दहन केले. शेतकरी संघटनेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी अकोला शहरातील तीनचार हजार नागरिकही हजर होते.

याच दिवशी शहरात मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रम होता. त्यामुळे कार्यकर्त्यांची धरपकड करून पुतळ्याच्या दहनाचा कार्यक्रम उधळून लावण्याचा पोलिसांचा बेत होता, पण कार्यक्रमासाठी जमलेल्या शेतकरी स्त्रीपुरुषांच्या प्रचंड संख्येच्या दबावामुळे कोणालाही अटक झाली नाही. कार्यक्रम अत्यंत शिस्तीने व शांततेने पार पडला. तरीही पोलिसांनी श्री. प्रकाश पोहरे, रावसाहेब कांबे यांच्यासह काही कार्यकर्त्यांच्या नावाने केसेस् लिहून ठेवल्या आहेत पण त्यासंबंधी काय कार्यवाही करावयाची हे संपूर्ण महाराष्ट्रातून या आंदोलनासंबंधी माहिती गोळा करून त्या अनुषंगाने ठरविले जाणार आहे असे कळते.

इकडे दारिद्र्यरेषेखालील शेतकरी स्त्रीपुरुष नेहरूनीतीचे दहन करीत होते तर शहरातील दुसऱ्या भागात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या दारिद्र्य रेषेखालील लोकांना मीठ, मिरची, तेल, डाळ आणि ज्वारी यांचे 'पंचपक्वान्न' स्वस्तात स्वस्त देण्याची आपली लोकप्रिय घोषणा करीत होते. ते अकोला शहरातील एका पाणीपुरवठा योजनेच्या भूमिपूजन समारंभात बोलत होते. मीठ, मिरची, तेल, डाळ आणि ज्वारी यांचे ज्यांनी किंवा ज्यांच्या भावाबहिणींनी उत्पादन केले त्यांनाच ते स्वस्त भावात पुरविण्याची कल्याणकारी भाषा शासनाला अजूनही अभिमानाने करावीशी वाटते याबद्दल नेहरूनीतीची होळी करून परतणारे शेतकरी आश्चर्य व्यक्त करीत होते.

**प्रेषक : श्री. प्रकाश पोहरे, अकोला**

# अमरावतीतील नेहरू मैदानाचे नाव बदलले

शुक्रवार दि. २ ऑक्टोबर १९९२ रोजी शेतकरी संघटनेच्या वतीने अमरावती येथील नेहरू मैदानावर, शेतकऱ्यांची लूट करणाऱ्या नेहरूनीतीच्या निषेधार्थ नेहरूंच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. या प्रसंगी जिल्ह्यातून १५०० महिला शेतकरी व ३००० पुरूष शेतकरी हजर होते.

प्रथम, दुपारी २ वाजता अमरावतीच्या धर्मदाय कॉटन फंडाजवळ शेतकरी स्त्रीपुरुष जमा झाले व तेथून मिरवणुकीने नेहरू मैदानाकडे निघाले. नेहरूनीतीच्या निषेधाच्या घोषणा देत मिरवणूक शहराच्या मुख्य रस्त्यावरून फिरून दीड तासाने नेहरू मैदानावर पोहोचली. तेथे जिल्हा प्रमुख संजय कोल्हे, या आंदोलनाचे सेनापती विजय कडू तसेच सौ. विमलकाकू पाटील, प्रा. कमल करवा व श्रीकांत तराळ यांची नेहरूनीतीच्या विरोधात भाषणे झाली. यापुढे या मैदानाचे नाव 'महात्मा जोतिबा फुले मैदान' असे राहील अशी घोषणा सेनापती विजय कडू यांनी केली. नंतर सायंकाळी ५ वाजता ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्री. जगन्नाथ बुरघाटे यांच्या हस्ते नेहरूंच्या पुतळ्याला अग्नि देण्यात आला.

सर्व कार्यक्रम शिस्तीने व शांततेने पार पडला. कार्यक्रमासाठी शंभरदीडशे पोलिसांचा बंदोबस्त होता. इंदिरा कॉंग्रेसचे कार्यकर्ते दूर उभे राहून कार्यक्रम पहात होते.

तत्पूर्वी सकाळी ९ वाजता शहरात एक सर्वपक्षीय सभा होऊन त्यात शेतकरी संघटनेवर शिवराळ भाषेत टीका करण्यात आली होती. नेहरूंच्या पुतळ्याचे दहन करू दिले जाणार नाही असा या तथाकथित सर्वपक्षीय सभेत दम दिला होता. पण, प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणची शेतकरी स्त्रीपुरुषांची संख्या व निर्धार पाहून कार्यक्रमाला विरोध करण्याचे धारिष्ट्य कोणाला झाले नाही.

**प्रेषक : श्री. श्रीकांत तराळ, अमरावती**

**शेतकरी संघटक**
**वार्षिक वर्गणी रुपये ३०/-**
**आजीव वर्गणीदार देणगी मूल्य रुपये ५००/-**
**– वर्गणी पाठविण्याचा व पत्रव्यवहाराचा पत्ता –**
**शेतकरी संघटक,**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण,**
**ता. खेड, जि. पुणे (४१० ५०१)**
म. ऑ. ने वर्गणी पाठविताना आपले संपूर्ण नांव व पत्ता म. ऑ. फॉर्मच्या तळाच्या कूपनवर न विसरता लिहावे.

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, सदाशिव पेठ, पुणे - २.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**